महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १२०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०२/२०१७

**१) घराच्या समोरील ताला तोडुन घरातील कपाटातुन पैश्याची चोरी . :–**

दिनांक १८/०२/२०१७ चे ०८.३० वा ते ११.०० वा. दर. यातील फिर्यादी श्रीमती शांतकला मछींद्र टेंभरे वय ३२ वर्ष, रा. इंदीराटोली मिटेवानी ही मजुरीचे कामाने घराला ताला लावुन बाहेर गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन फिर्यादीचे घरातील कपाटामधील २,०००/–रु. ची १ नोट ५००/–रु. चे ४ नोटा व इतर १००,५०,१०/–रु. च्या नोटा असे एकुण १२,०००/–रु. चा चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५४,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निंबेकर पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०२/२०१७ चे ०६.०० ते १८.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष, हीला संशयीत आरोपीने फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३६३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. लाकडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे, दोन जखमी . :–**

दिनांक १७/०२/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी मंगेश सिताराम वरखडे वय २८ वर्ष, रा. किनी (मोखे) हा त्याचा मित्र फुलचंद सोनवाने रा. किनी याचे सोबत त्याची हिरो ग्ल्यॉमर मोटार सायकल क्र. एमएच ३६ एस ८७७६ नी साकोलीला जात असतांना समोरुन येणाऱ्या अज्ञात आरोपी मोटार सायकल हयगयीने, भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीस व फिर्यादीचा मित्र फुलचंद यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भांदवी. सहकलम १३४/१७७, १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोडंगे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) जुन्या भांडणावरुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १७/०२/२०१७ चे १८.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच गावचे राहणारे असून एकाच समाजाचे आहेत त्यांचे जुन्या भांडणावरुन आरोपी ने फिर्यादी व राजेंद्र गजभिये (ठेकेदार) यांचे पती पत्नी सारखे फोटो छापुन गावात बदनामी केल्याने फिर्यादीने आरोपीस हटकले असता अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०१,५०६ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चांदेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**५) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन लाकडी दांडयाने मारुन जखमी केले . :–**

दिनांक १३/०२/२०१७ चे १७.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी प्रशांत बाबुराव माटे वय ३२ वर्ष, रा. आबांडी व आरोपी हे सख्खे भाऊ असून एकाच घरी एकत्र राहतात आरोपीने टि.व्ही चा आवाज मोठयाने केल्याने फिर्यादीने टि.व्ही चा आवाज कमी कर असे सांगुन टि.व्ही बंद केला असता आरोपीने घरा बाहेरुन हातात लाकडी दांडा आणुन भांडण व शिवीगाळ करुन फिर्यादीचे गुडघ्याचे खाली मारले तेव्हा फिर्यादी ने हात आडवा केला असता दांडयाचा मार डाव्या हाताच्या मधल्या बोटाला लागुन बोट फॅक्चर झाल्याने फिर्यादीचे तोंडी, डॉ. रिपोर्ट, व एक्सरे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२५,५०४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

६) अवैध दारु/ जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक १८/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, सिहोरा, गोबरवाही, लाखांदुर व आंधळगाव येथील अवैध दारू /जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४० लिटर हातभट्टी दारु किंमती ३४००/–रु. ३ लिटर ६० मिली देशी किंमती ८५०/–रु. व जुगारातुन ५५५/–रु. असा एकुण किंमती ४,८०५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

सपोनि. के. एम.हत्तीमारे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.